

॥ श्री ॥

मनोजवं मारुततुल्यवेगमं । जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ॥
वातात्माजम् वानरयुथमुख्यं । श्रीरामदूत शरणं प्रपद्ये ॥

। श्री गणेशाय नमः ।
। श्री सरस्वतये नमः ।
। श्री सद्गुरू ज्ञानदेवाय नमः ।
। श्री सद्गुरू विश्वनाथाय नमः ।
। श्री सद्गुरू गोविंदनाथाय नमः ।
। श्री सद्गुरू माधवनाथाय नमः ।

# ॥ श्री वानरगीता ॥

पंचगंगा नदीतीरावर। नांदे श्रीक्षेत्र करवीर।
तेथ वास करी निरंतर । श्री महालक्ष्मी जगदंबा ॥१॥
याच पवित्र क्षेत्रात। वसती माझें सद्‌गुरूनाथ।
सांगवडेकर दादा माधवनाथ। नाम विख्यात सर्वत्र ॥ २ ॥
गुरुमाऊली तेथे करविरी। लेकरू पुण्यांत दुरवरी ।
तीव्र ओढ लागतां अंतरी। भेटाया तात्काळ जातसे ॥ ३ ॥
तसाच एके दिवशी जातां । आनंदली श्री गुरुमाता ।
म्हणे जाणून काय मनोगता। धावुन आलास तातडी ? ॥ ४ ॥
पहा पहा ही वानरगीता। लखलखती विद्युलता।
हिचा अंतरी प्रवेश होतां। अंधार सारा दूर होई ॥ ५॥
सखाराम कृष्णाजी देवधर। ज्ञानेश्वर माऊलीचे भक्त थोर ।
त्यांनी प्रेमे ठेविली ही हातावर । लोकोध्दार करावया ॥ ६ ॥
म्हणाले हा प्रसाद आपण सेवावा । सश्रद्ध भक्तांनाही वाटावा।
संसार दुःखे गांजल्या जीवां। संपूर्ण सुखी करावे ॥ ७ ॥
याच होतो विचारांत। एवढ्यात आलास तुं धावत ।
वाटे विश्वनाथ महाराजांनीच तुला येथ। धाडिलें वांछित पुरवाया ॥ ८॥
ग्रंथ आहे संस्कृतात । तो अनुवादावा अमृत ओवीत ।
अवीट ब्रम्हरस सुस्वाद । अज्ञानीही चाखावा ॥ ९ ॥
सद्‌गुरू आज्ञाप्रमाण। परि एक आहे नम्र प्रश्न ।
हाच ग्रंथ निवडण्याचे कारण। सांगावे मज गुरुनाथा ॥ १० ॥



सद्‌गुरुनी मंदहास्य केले। म्हणती योग्य तू विचारलें।
'हंसगीता', ऐक भले। कान जीवाचे करोनि ॥११॥
या वानरगीतेच्या उपासनेने। उद्धरले आमुचे घराणे।
जणू पडीक तापली बरड राने। सुजल सुफल जाहली ॥१२॥
धनदौलत उदंड होती। उतू जात होती श्रीमंती।
परी वंश उजळाया दिवा पणती। तेवत नव्हती घरांत ॥१३॥
सर्व सुखे असूनही। एक दुःख जाळत राही।
वांझ उदासीन दिशा दाही। वाटत होत्या सर्वांना ॥१४॥
परी अकस्मात नवल घडलें। श्रीविश्वनाथ महाराज घरी आले।
त्यांची लागतां पावन पाऊलें। दुःख गेले लयाला ॥१५॥
त्यांनी आमच्या चंद्रा आजीला। वानरगीतेचा मंत्र दिला।
दृढ चालविता उपासनेला। फळ आले रसाळ ॥१६॥
कुळाचे भाग्य उजळलें। चार सत्पुरुष जन्मा आले।
माझेही जीवन कृतार्थ झाले। याच वंशवेलीवर येऊन ॥१७॥
या उपासनेचे प्रत्यक्ष प्रमाण। साकाररूप मीच जाण।
बाणवून ही मनीं खूण। गुह्य प्रगट करावे ॥१८॥
ऐकता सद्‌गुरुंचे शब्द। मनोमन झालो मी निशब्द।
आठवले मुनींद्र विश्वनाथ चरित्रामृत। सद्‌गुरुनीच घडविलेले ॥१९॥
त्या आठवणीने गदगदून। सद्‌गुरुंचे धरिलें चरण।
प्रार्थिले आपणच हृदयी बसून। बोलवावें या लेकरा ॥२०॥



यावरी कुरवाळून या 'हंसगीता' । सद्गुरुनी वरदहस्त ठेविला माथा ।
गुरुमौनातून प्रगटली जी गाथा । तीच आता ऐकावी ॥२१॥

वानरगीता महान स्तोत्र। मंत्रकर्ता ऋषी पराशर ।
देवता हनुमान वीरवर । चिरंजीव तिन्ही लोकी ॥२२॥

मिरवी वेदांतील 'जगती' छंद । 'मरुतात्मज' बीज सुप्त ।
'शक्ती' आहे अंजनीसुत। 'वायुपुत्र' ही 'किल्ली' असे ॥२३॥

वानरगीतेचा करितां पाठ । हनुमंताचा लाभे कृपाप्रसाद ।
पुरवितो तो सर्व मनोरथ। दृढ विश्वास धरावा ॥२४॥

या स्तोत्राचे करिता पठण । आयुष्य होई आरोग्यसंपन्न ।
सात्विक संततीचे लाभे दान। श्री हनुमान कृपेनें ॥ २५॥

तसेच घडतां नित्य चिंतन। ईश्वर प्रेम वाढे पूर्ण।
स्त्रियांचे व्यंध्यत्त्व जाऊन । जीवन सफल होतसे ॥२६॥

स्त्रिया असती ज्या गर्भवती। त्या गर्भाची नियमित होई गती ।
सुलभ होई त्यांची प्रसूती । अरिष्ट सारे टळतसे ॥२७॥

शक्तिमंत बुद्धिमंत । महाकाय महाबलवंत ।
परी राही भक्तांच्या मुठींत । भक्तिप्रेमा भुलोनी ॥२८॥

परम प्रतापी हनुमान। बैसला वीरासन घालून ।
उगवत्या सूर्याचं घडतां दर्शन। तेज अंतरी संचरे ॥२९॥

पाहतां श्रेष्ठ ज्ञानमुद्रा। भरती येई हृदयसमुद्रा।
मिटलेल्या आमुच्या अंतरनेत्रा। जाग येई हळूहळू ॥३०॥



जो बसला कर्दलीवनात । मुनिजन ज्याला वन्दितात ।
जो मग्न ब्रम्हचिंतनात। त्याचे ध्यान करावें ॥३१॥
हनुमंताचें करितां ध्यान। निर्मळ होई अंतःकरण ।
हृदयस्थ होऊन वायुनंदन। मार्ग दाखवी भक्तांना ॥३२॥
भक्त छत्तीस वानरगण। साक्षात छत्तीस तत्वे जाण ।
श्रीकृष्णानें दाविलीं खूण। गीतेमाजीं अर्जुना ॥३३॥
या छत्तीस तत्वांचे ऐक्यनिधान। तोच मूर्तिमंत हनुमान ।
वानर गाती त्याचें महिमान । तें भाव धरून ऐकावें ॥३४॥
कोट्यावधी गाई घोडे गेले अर्पण। वरी सुवर्णपर्वतही दिला दान।
तरी फळ लाभे समसमान। केवळ मारुती दर्शनं ॥३५॥
हनुमंत हेंच माझें स्नान। हनुमंत हेंच मंत्रपठण ।
हनुमंत हेंच पूजाध्यान। गुणसंकीर्तन हेंच माझें ॥ ३६॥
रामभक्ताचें चरित्र। उदार परम पवित्र ।
मृता लाभे संजीवन मंत्र। अमृतकथा ऐकता ॥३७॥
वायुपुत्राचे गुणगान । हेंच खरें संकीर्तन ।
मस्तकीं त्याचे धरावे चरण। सेवा घडो जन्मोजन्मी ॥३८॥
सुवर्चला देवी माझी माता। वायुपुत्र हा माझा पिता।
हनुमंत भक्त तो तो भ्राता। हनुमंत माझें गुरु गोत्र ॥३९॥
लोकोत्तर भक्त हनुमान। कसे वर्णावे त्याचे गुण ।
सवर्चलापती करी वंदन। सर्वस्व चरणी वाहुनी ॥४०॥



वायुपुत्र हनुमंताने। योजना केली ज्या कार्याकारणें।
ते कार्य सिद्धीस नेईन निष्ठेनें। परी कर्ता करविता हनुमंत ॥४१॥
जो वायुशीं स्पर्धा करी। द्विजाज्ञा वाहे शिरीं।
मनादि इंद्रिये करिते चाकरी। त्या जितेंद्रिया नमस्कार ॥४२॥
हनुमंताचे स्मरण करितां। शुभाशुभाची फिटे वार्ता।
प्रसन्नता लाभे चित्ता। अविरत प्रेम ओसंडे ॥४३॥
रामरावण युद्धांत। दोघेही झाले कीर्तिवंत।
परी अंत न करितां जो अलिप्त। त्या हनुमंता वंदित्तो ॥४४॥
नित्यनेम मंगळवारी। हनुमंताची जो पूजा करी।
तो चिरायू होवो पृथ्वीवरी। स्त्रीपुत्रऐश्वर्यासहित ॥४५॥
ज्यानें तप्त सूर्य कवटाळीला। अलंघ्य समुद्र उल्लंघिला।
रावण तृणवत मानिला। त्या हनुमंता नमस्कार ॥४६॥
सागर लीलया लंघून। घेतले सीतामाईचें दर्शन।
क्रोधे केले लंकादहन। त्या रामभक्ता नमस्कार ॥४७॥
हनुमंताचे वंदितो चरण। सदैव करितो प्रेमे पूजन।
वाचें मंगल नाम उच्चारण। शुभ कीर्तन हे अखंड ॥४८॥
शरीर बालकासमान सुकुमार। परी हात वज्रासम कठोर
बाहू स्फूर्ती अनिवार। श्रेष्ठ हनुमंत महाबली ॥४९॥
पर्वतवीर ज्याचा पिता। सती अंजनी ज्याची माता
शरण शरण त्या हनुमंता। त्यावीण अन्य नेणें मी ॥५०॥



करितां हनुमंताचे चिंतन। बुद्धी, बल, यश लाभे पूर्ण।
कुशल वाक्पटुत्व ऐकून। पंडित होती विस्मित ॥५१॥
धैर्य, निर्भयत्व अंगी येई। शत्रूचें भय लवही नाहीं।
हनुमंतभक्ताचे पाही। सामर्थ्य आहे अगाथ ॥52॥
प्रभू रामचंद्राचे अंतःकरण। सीता वियोगे होते विदीर्ण।
घडवून दोघांचे पुनर्मीलन। सुखी केले श्रीरामा ॥ ५३॥
जो स्वामीची सेवा करी। आणि आपुल्या भक्ता उरी धरी
त्या रामदूताच्या चरणांवरी। आदरे माथा ठेवितों ॥५४॥
अंजनीपुत्र स्वामिनिष्ठ। त्तिन्ही लोकीं वीरवरिष्ठ।
ब्रम्हरूप तो हनुमंत। वंदितो मी पुनःपुन्हां ॥५५॥
हनुमंतासम सुरवर। नाही दुजा भुतलांवर।
ब्रम्हा विष्णू महेश्वर। त्याच्या रूपात पूजितो ॥५६॥
वेदशास्त्रे सर्व भली। ऋषीमुनींनी अभ्यासिली।
बाहे उभारुनि गर्जना केली। परम देवत हनुमंत ॥५७॥
अंजनीचा जो सुपुत्र। जो श्रीरामाचे प्राणपात्र।
सर्व वानरगणांत अत्ति पवित्र। तो हनुमंत मंगल ॥५८॥
जो अपार करुणेचा सागर। जो साधुसंताचा पालनहार।
ब्रहाच जे समूर्त साकार। तो हनुमंत वंदितो ॥५९॥
सर्वांचे करावे रक्षण। अंतरी उठे जे स्फुरण।
या प्रेरणेचें उगमस्थान। वानरश्रेष्ठ हनुमंत ॥६०॥



हनुमंताचे नामस्मरण । भुक्ति मुक्ति करी प्रदान ।
मग अन्य दैवताचें चिंतन। का करावे मूढपणे ॥६१ ॥

एका हनुमंतावाचून । ना कुणा मी प्रार्थिले जाण ।
त्यानें प्रसन्न होऊन। फळ दिले याच जन्मीं ॥६२॥

आतां हे चरण कधीं न सोडीन। ती पायधूळ माझ्या भाळीं भूषण ।
सेवा त्याची अखंड करीन। जन्मोजन्मी श्रद्धेनें ॥६३॥

रसने, तूं खरी रसज्ञ। कां मधुर रसांत होसी मग्न ।
हनुमंत नामामृत नित्य सेवून । तृप्त होई निरंतर ॥६४॥

हनुमंताचें शुभ ध्यान। करी सर्व अशुभ निवारण ।
वैधृती, व्यतिपात, कुयोग दहन। स्मरण मात्रे होतसे ॥६५॥

जो पृथ्वीपदाचा दाता। मार्गज्ञ आणि ज्ञाणता ।
तो हनुमंत पुढे असत्ता। वाट कशी चुकेल? ॥६६॥

धन्य धन्य मी अनुग्रहीत। धन्य धन्य मी पुण्यवंत ।
मला लाभलें ऐश्वर्य, महात्म्य । हनुमंत चरण सेवेनें ॥६७॥

आधार तूं या शरणागता। तूंच माझा रक्षणकर्ता ।
कृपावंत होऊन हनुमंता। रक्ष रक्ष दासाला ॥६८॥

अखंड बुडालो पापडोहांत। परि मन राहे सुखासक्त ।
प्रभू हनुमंता येऊन त्वरित । उद्धरावें पाप्याला ॥६९॥

हनुमंताच्या आज्ञेवाचून। जगीं काहीं न घडते जाण ।
सफळ होती सर्व प्रयत्न। म्हणून चरण धरावे ॥७०॥



हनुमंता, शतावधि अपराध। दयाळू होऊन घाल पोटांत ।
तूं करुणासागर अगाध। क्षमा करावी दासाला ॥७१॥
हनुमंताहून श्रेष्ठ कांही। या जगीं प्राप्तव्य नाहीं।
एकनिष्ठ उपासनेंने पाही। सर्व कांही लाभतसे ॥७२॥
हनुमान माझी माता। हनुमान माझा पिता।
हनुमान भगिनी चाता। धन उन्नती हनुमान || 73 ||
माझा स्वामी हनुमान। सर्वस्व माझे तोचिजाण ।
सदैव त्याचे करितो चिंतन। चरण धरून हृदयाशीं ॥७४॥
जेथे जेथे मी जाई। हनुमंता तूं त्या त्या ठाई।
रिता न ठाव कोठेही। त्रिवार शरण म्हणुनिया ॥७५॥
तुझे स्तवन करितां करितां। जरी वर्ण पद मात्रा चुकल्या अजाणता
तरी क्षमा करावी हनुमंता। शरणभाव जाणोनी ॥ 76 ॥
रक्ष रक्ष मज पाण्यात। पृथ्वावर आणि अरण्यात ।
रक्ष रक्ष मज सर्वत्र। ऐक हनुमंताः प्रार्थना ॥७७॥
ऐकून वानरगणांचे गुणगान। भरून आले अंतःकरण ।
एका हनुमंतावाचून। अन्य कांही दिसेना ॥७८॥
कशी लाभली सहज अवस्था। विसरल्या साऱ्या संसारव्यथा।
हनुमंत चरणी टेकीला माथा। हंसगीतत्व वाहुनी ॥७९॥
वानरगीतेची फलश्रुति। ऐका भाव धरून चित्ती ।
सर्व सुखे पावाल निश्चिती। अनुभवाचे बोल हे ॥८०॥



पूर्ण श्रध्दायुक्त होऊन । वानरगीतेचे करितां पठण ।
पुत्र पौत्र संपत्ती लाभून। सुखी व्हाल संसारी ॥ ८१ ॥
ऐश्वर्य भोगाल चिरंतनः । दीर्घायुष्याचे मिळेल दान ।
व्हाल त्रिखंडकीर्तिसंपन्न । हे निःसंशय जाणावे ॥८२॥
हनुमंताचा लाभता कृपाप्रसाद। साधक होईल सहजसिद्ध
मिळेल त्याला श्वाश्वतपद। जन्ममरण नाही पुन्हा ॥ ८३ ॥
हा पराशरसंहितेतला । वानरगीता नामे उपनिषदामधला
ब्रम्हविद्यांषर्गन मोक्षमार्गी भला । अध्यान पंचविसावा संपल ॥८४॥
मैत्रेय पराशर संवादांत। हनुमंत महात्य लपलेले गुप्त ।
ते शुद्ध करविले प्रगट । सद्‌गुरुंनीच हृदयीं बसोनि ॥८५॥
सद्‌गुरु आणि हनुमंत। दोघे एकरुप अभेद ।
'चरणीं मस्तक ठेवून 'हंसगीत' । समर्पित झाला संपूर्ण ॥८६ ॥

श्रीमत सच्चिदानंद सद्‌गुरु श्री विश्वनाथ महाराज की जय ।
श्रीमत सच्चिदानंद सद्‌गुरु श्री गोविंदनाथ महाराज की जय ।
श्रीमत सच्चिदानंद सद्‌गुरु श्री माधवनाथ महाराज की जय ॥
॥ ओम शांतिः शांतिः शांतिः ॥